# ई - पोलीस पत्रिका

दि २१/१२/२०२३ अनु.क्र.२२७

## (अमरावती शहर पोलीसांची २०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/पशा-१/अर्जित रजा/पो.अधिकारी/१००/२०२३ अमरावती शहर दिनांक १८/१२/२०२३**

### आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जित रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. गजानन गुल्हाणे पोलीस निरीक्षक | गाडगेनगर | अर्जित रजा | दि. १२.१२.२०२३ ते दि.२६.१२.२०२३ पर्यंत १५ दिवस | श्री. वैभव पानसरे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. गाडगेनगर |

**२.पोआअ/पशा-१/से.नि.पुर्व रजा/पोउपनि-भांदर्गे/१५३३०/२०२३ अमरावती शहर दिनांक १३/१२/२०२३**

### आदेश

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ उपकलम ६६ (१) अन्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत सेवानिवृत्तीपुर्व रजा मंजुर करण्यात येत असुन त्यांचे खाती जमा असलेल्या अर्धवेतनी रजेमधुन त्यांना मंजूर करण्यात आलेल्या रजेच्या दुप्पट रजा खर्ची घालण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण | रजा मंजुरीचा प्रकार | रजा मंजुरीचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. प्रदिप भांदर्गे, पोलीस उपनिरीक्षक | डायल-११२, पो. आ. कार्यालय, अमरावती शहर | सेवानिवृत्तीपुर्व रजा | दि. २६.१२.२०२३ ते २४.०१.२०२४, (एकुण ३० दिवस) (से.नि.दि. - ३१.०७.२०२४) |

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतीम आदेश/पोशि-३१७ आतराम/१५२८८/२०२३ अमरावती शहर दिनांक १५/१२/२०२३**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोकॉ/३१७ अविनाश आतराम, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचा विनंती अर्ज दिनांक ०६/०६/२०२३
२) या कार्यालयाचे बिनतारी संदेश क्रमांक पोआअ/आस्था-१/सार्वत्रिक बदल्या-२३/ आ.कक्ष/१४०६/२०२३ अमरावती शहर, दिनांक १४/०६/२०२३
३) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/पोकॉ-३१७ आतराम/७२८८/२०२३ अमरावती शहर, दिनांक २१/०६/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** पोकॉ/३१७ अविनाश आतराम, नेमणुक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोकॉ/३१७ अविनाश आतराम, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन वरील संदर्भीयक क्रमांक ०१ अन्वये बदली साठी या कार्यालयात विनंती अर्ज केला होता. बदलीच्या अनुषंगाने तुम्हाला दिनांक १५/०६/२०२३ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले होते. तरी तुम्ही मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात हजर होते वेळेस तुम्ही परिधान केलेला गणवेश बरोबर नव्हता व कटींग ची पाहणी केली असता तुमची कटींग वाढलेल्या स्थितीमध्ये आढळुन आली आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे दिसुन आले. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या कर्तव्यावर गैरहजर गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ५००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये **?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही दिनांक २६/०६/२०२३ रोजी स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले नाही.तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा पोआअ/विचौ-२/का.दा.नो./स्पष्टीकरण-अप्राप्त/पोकॉ-३१७ आतराम/८३०८/२०२३, दिनांक १९/०७/२०२३ अन्वये स्पष्टीकरण सादर करणे करीता एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केलेले नसुन पुन्हा संधीबाबतचे पत्र सुध्दा तुम्हाला दिनांक २०/०७/२०२३ रोजी तामील झाल्याबाबत तामील प्रत या कार्यालयात प्राप्त झालेली आहे.तरी तुम्हाला दिनांक ०७/०७/२०२३, दिनांक १३/१०/२०२३ व दिनांक ०८/१२/२०२३ रोजी तुमचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकुण घेण्याकरीता मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षेत हजर न होता आज्ञांकित कक्षेत गैरहजर राहिले असुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेली शिक्षा कायम ठेवुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. ५००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतीम आदेश/पोशि-१६७० तंतरपाळे/१५२७५/२०२३ अमरावती शहर दिनांक १५/१२/२०२३**

**संदर्भ क्रमांक** :- १) पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ६१६/२०२३, दिनांक ०४/०४/२०२३
२) सहायक पोलीस आयुक्त, गाडगे नगर विभाग अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक

१९०३/२०२३,दिनांक २७/०३/२०२३

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वलगाव, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक ३५५/२०२३,दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा कसुरी अहवाल.

४) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/गैरहजर/का.दा.नो/पोकॉ-१६७० तंतरपाळे/५६६६/२०२३ अमरावती शहर, दिनांक १६/०५/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** पोकॉ/१६७० प्रफुल्ल भिमराव तंतरपाळे, नेमणुक पोलीस स्टेशन वलगाव, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोकॉ/१६७० प्रफुल्ल भिमराव तंतरपाळे, पोलीस स्टेशन वलगाव, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन तुमची दिनांक ०३/०२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे लॉक-अॅप गार्ड डयुटी असतांना तुम्ही अनाधिकृतपणे कर्तव्यावरुन गैरहजर राहिले असल्याबाबत व.पो.नि., पो.स्टे.वलगाव यांना माहिती मिळाली. त्याबाबत पो.स्टे.सिटी कोतवाली स्टेशन डायरी नोंद क्र. ०७/२३, वेळ १४.०५ प्रमाणे तसेच दिनांक ०३/०२/२०२३ रोजी स्टेशन डायरी नोंद क्र. ११/२३, वेळ ११.४३ वा. प्रमाणे गैरहजरी बाबत नोंद घेण्यात आली आहे. तुम्हाला कर्तव्यावर हजर होण्याकरीता तुमच्या मोबाईल फोनवर संपर्क केला असता तुम्ही प्रतीसाद दिला नाही व दिनांक ०३/०२/२०२३ पासुन ते दिनांक १२/०२/२०२३ पावेतो सतत परस्पर कोणतीही पुर्व सुचना न देता कर्तव्यावरुन गैरहजर राहिले. तुम्हाला गैरहजेरी संबधाने खुलासा मागीतला असता प्रकृती बिघाडल्या मुळे तुम्ही कर्तव्यावर गैरहजर राहिल्याबाबत खुलासात कारण नमुद केले आहे. परंतु ईलाजा संबधीत कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. ईलाजाचे कागदपत्र सादर करण्याबाबत तुम्हाला व.पो.नि.पो.स्टे.वलगाव यांनी वारंवार सुचना देवुनही तुम्ही तुमच्या स्वत:च्या प्रकृतीबाबतचे (ईलाजाचे) कोणतेही कागदपत्र सादर केलेले नाही. तुम्ही कर्तव्यावरुन वारंवार गैरहजर राहण्याच्या सवईचे असुन तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तीच्या दलामध्ये कर्तव्यावर असुन अशोभनीय असे वर्तन केले आहे. तरी तुम्हाला नेमुन दिलेल्या तुमच्या कर्तव्यात गैरहजर राहुन कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ दोन (२) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का ? रोखण्यात येवु नये म्हणुनकारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक ०८/१२/२०२३ रोजी तुमचे म्हणणे प्रत्यक्ष ऐकुण घेण्याकरीता मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञांकित कक्षेत हजर न होता आज्ञांकित कक्षेत गैरहजर राहिले. सादर केलेले स्पष्टीकरण संयुक्तीक व समाधानकारक न वाटल्याने प्रस्तावित तरी सुध्दा तुम्हाला पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार "**रु. १०००/- दंडाची शिक्षा देण्यात येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यस्थीत होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव गृह विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज दोन प्रतित सादर करु शकता.

**३.पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/अंतिम आदेश/आरमोरर पोशि-१६६९ घारड/१५२९२/२०२३**
**अमरावती शहर दिनांक १५/१२/२०२३**

**संदर्भ** :- १) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचे कडील जावक क्रमांक २४४६/२०२३,दिनांक ०१/०९/२०२३

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी अहवाल/का.दा.नो/ आरमोरर पोकॉ-१६६९ घारड/११०२०/२०२३ अमरावती शहर, दिनांक ०४/१०/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** आरमोरर पोकॉ/१६६९ गजानन घारड, नेमणुकपोलीस मुख्यालय, अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही आरमोरर पोकॉ/१६६९ गजानन घारड, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन पावसाळा असल्यामुळे वातावरणातील थंडाव्यामुळे शस्त्र खराब होवु नये म्हणुन शस्त्रगार मॅग्झीन मधुन (१) Rifle No. १ MK ३/१ ३०३ चे २३२ नग, (२) मस्केट A१० चे १२३ नग बॅनेटस्कॅबर्ड सह काढुन व शस्त्रगार प्रमुख यांना BPC CRC, C/Cleaning & Oiling चे काम केले असुन दिनांक २६/०८/२०२३ रोजी तुम्हाला शस्त्रागार प्रमुख पोहेकॉ/९१० विनोद वाघमारे यांचे सोबत शस्त्र ठेवण्यास मदत करण्याचे काम दिले असतांना तुम्ही शस्त्रगार प्रमुख यांचे समक्ष शस्त्र नुकसान व्हायाच्या उदेशाने शस्त्र फेकले असल्यचे निदर्शनास आले आहे. शास्त्रगार प्रमुख पोहेकॉ/९१० विनोद वाघमारे यांनी प्रमुख आयुधिक सपोउपनि/८५४ सुनिल कळंबे यांना माहिती दिली आहे, तसेच राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री हनवते यांना ही माहिती फोन व्दारे दिली आहे. तुम्ही वर्कशॉप मध्ये असेच शस्त्र टेबलावर आपटता, जेने करुन वाद होवुन वर्कशॉप मध्ये भांडण होईल किंवा शस्त्राचे नुकसान होईल अशा हेतुने तुम्ही तुमच्या कर्तव्यामध्ये कसुर केलेला आहे. तरी तुमचे हे कृत्य निष्काळजीपणाचे व बेजबाबदारपणाचे असुन तुम्ही तुमचे कर्तव्यात निष्काळजीपणा/बेजबाबदारपणा केला असुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) मधील (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ एक (१) वर्षाकरीता (परिणाम न होता)** का ? रोखण्यात येवु नये म्हणुनकारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.सदर कारणे दाखवा नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. तरी तुम्हाला दिनांक ०८/१२/२०२३ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन तुमचे म्हणणे ऐकुण घेतले असुन व सादर केलेले स्पष्टीकरणाचे अवलोकन करुन तुम्हास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**४.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतीम आदेश/पोहवा-११७९ देवकर+१/१५२९२/२०२३**
**अमरावती शहर दिनांक १५/१२/२०२३**

**संदर्भ** :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर यांचे कडील जावक

क्रमांक ९८९/२०२३, दिनांक २८/०२/२०२३

२) या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो/पोहेकॉ-११७९ देवकर + १/३६६०/२०२३ अमरावती शहर, दिनांक १८/०४/२०२३.

**कसुरदारचे नाव :-** (१) पोहवा/११७९ टुलाराम देवकर, नेमणुक पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर.
(२) चालक पोशि/१६९४ अश्विन पवार, नेमणुक मोटार परिवहन विभाग, अम.शहर.

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही (१) पोहवा/११७९ टुलाराम देवकर, पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर, (२) चालक पोशि/१६९४ अश्विन पवार, मोटार परिवहन विभाग, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन दिनांक ०३/०२/२०२३ रोजी सि.आर.१ मोबाईल वर डयुटी असतांना व.पो.नि. पोस्टे राजापेठ यांनी पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीता असतांना सि.आर.मोबाईल व बिट मार्शल यांना चेक केले असता, सि.आर.१ मोबाईल तुम्हाला १४.२५ वा. कॉल केले असता, तुम्ही कॉलला कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने तुमची स्टेशन डायरी साना नं.३२/२०२३ दिनांक ०३/०२/२०२३ प्रमाणे १४.२५ वा. स्टेशन डायरीला गैरहजेरी बाबत नोंद घेवून त्याबाबत व.पो.नि. पोस्टे राजापेठ यांनी तुमचा खुलासा घेतला असता तुम्ही जेवन करीत असल्याचे उडवा उडवीचे कारण सांगीतले. तसेच व.पो.नि राजापेठ सि.आर.मोबाईल व बिटमार्शल यांना वेळोवेळी मा.वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे चेक करुन कर्तव्याबाबत योग्य त्या सुचना दिल्या असता तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या सुचनाकडे दुर्लक्ष करुन तुमचे कर्तव्यात हलगर्जीपणा/निष्काळजीपणा करुन कर्तव्यात कसुर केलेला आहे.

अशा प्रकारे तुम्ही उपरोक्त प्रकरणी कसुरी केल्याने तुमच्या या गैरवर्तन कसुरी बद्दल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (४) चे तरतुदी नुसार **रु. ३०००/-** दंडाची शिक्षा का करण्यात येवु नये **?** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले नाही.तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर न केल्याने पुन्हा जावक क्रमांक पोआअ/विचौ-२/कसुरी/का.दा.नो.ता.प्रत/स्पष्टीकरण/पोहेकॉ-११७९ देवकर+१/८१९६/२०२३, दिनांक १७/०७/२०२३ अन्वये स्पष्टीकरण सादर करणे करीता एक संधी देण्यात येवुन सुध्दा तुम्ही स्पष्टीकरण सादर केले नाही. तरी तुम्हाला तुमचे मौखीक म्हणणे मांडण्याकरीता दिनांक ०८/१२/२०२३ रोजी मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आज्ञांकित कक्षात समक्ष बोलावुन (१) पोहवा/११७९ टुलाराम देवकर हे आज्ञांकित कक्षात हजर राहुन त्यांचे मौखीक म्हणणे मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना सांगीतले असुन मा.पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी मौखीक म्हणणे ऐकुण घेवुन तसेच (२) चालक पोशि/१६९४ अश्विन पवार हे रजेवर असल्याने आज्ञांकित कक्षात हजर राहु शकले नाही. तरी पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

तरी वर नमुद कसुरदार यांनाउपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप-नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **"सक्त ताकीद"**ही शिक्षा देण्यात येत आहे.

**भाग-३**

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चितीती

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/सुधा.किमान वेतन/१५२५२/२०२३ दि.१३/१२/२०२३ अमरावती शहर**

**आदेश क्र.०१**

शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर-११२२/प्र.क्र.६/सेवा-९ दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ नुसार सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सरळसेवेने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ज्या पदावर दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर या नियमांच्या जोडपत्र तीन नुसार सेवाप्रवेश वेतन अनुज्ञेय ठरते, अशा पदांवर दिनांक ०१ जानेवारी २००६ पुर्वी नामनिर्देशनाने अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या आणि दिनांक ०१ जानेवारी २००६ रोजी पोटनियम (१) कलम (अ) अन्वये वेतननिश्चिती केलेल्या शासकिय कर्मचा-याचे वेतन, सरळसेवा नियुक्तींसाठी जोडपत्र तीन मध्ये विहिती केलेल्या सेवाप्रवेश वेतनापेक्षा कमी निश्चिती होत असेल तर, ते दिनांक ०१ जानेवारी २००६ पासून उंचावून देण्यात यावे कि, ज्यामुळे अशा सेवाप्रवेश वेतनापेक्षा ते कमी असणार नाही असे नमूद करण्यात आले आहे.

**त्याअनुषंगाने पोहवा/१५८, सागर शशिकांत सरदार,नेमणूक पो.स्टे.राजापेठ,अमरावती शहर, (नेमणूक दिनांक १५.०२.२००३)** यांची शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-२००९ मधील जोडपत्र-३ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुधारीत वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी | ग्रेड पे |
|---|---|---|
| पोलीस शिपाई | रु.५२००-२०२००/- | रु.२०००/- |

| विद्यामान वेतन व दिनांक | | | सुधारीत देय वेतन व दिनांक | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत वेतन बँड/वेतन श्रेणी मधील वेतन | |
| | वेतन बँड | ग्रेड वेतन | | वेतन बँड | ग्रेड वेतन |
| ०१/०१/२००६ | ६२७०/- | रु.२०००/- | ०१/०१/२००६ | रु. ६४६०/-<br>**शासन अधिसुचना वित्त विभाग, दिनांक ०३.०२.२०२३ मधील तरतुदीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम-** | रु.२०००/- |

| | | | | २००९ मधील जोडपत्र-३ नुसार अनुज्ञेय वेतन | |
|---|---|---|---|---|---|
| ०१/०७/२००६ | रु.६२७०+२५०=६५२०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००६ | रु.६४६०+२६०=६७२०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००७ | रु.६५२०+२६०=६७८०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००७ | रु.६७२०+२७०=६९९०/- | रु.२०००/- |
| ०१/०७/२००८ | रु.६७८०+२७०=७०५०/- | रु.२०००/- | ०१/०७/२००८ | रु.६९९०+२७०=७२६०/- | रु.२०००/- |
| २०/११/२००८ | रु.७०५०+२८०=७३३०/-<br>पोना पदावर पदोन्नती झाल्याने नियम ११ (१)(ए) नुसार वेतननिश्चिती. | रु.२४००/- | २०/११/२००८ | रु.७२६०+२८०=७५४०/-<br>पोना पदावर पदोन्नती झाल्याने नियम ११ (१)(ए) नुसार वेतननिश्चिती. | रु.२४००/- |
| ०१/०७/२००९ | रु.७३३०+३००=७६३०/- | रु.२४००/- | ०१/०७/२००९ | रु.७५४०+३००=७८४०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१० | रु.७६१०+२९०=७९३०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१० | रु.७८४०+३१०=८१५०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०११ | रु.७९३०+३१०=८२४०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०११ | रु.८१५०+३२०=८४७०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१२ | रु.८२४०+३२०=८५६०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१२ | रु.८४७०+३३०=८८००/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१३ | रु.८५६०+३३०=८८९०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१३ | रु.८८००+३४०=९१४०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१४ | रु.८८९०+३४०=९२३०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१४ | रु.९१४०+३५०=९४९०/- | रु.२४००/- |
| ०१/०७/२०१५ | रु.९२३०+३५०=९५८०/- | रु.२४००/- | ०१/०७/२०१५ | रु.९४९०+३६०=९८५०/- | रु.२४००/- |

## आदेश क्र.(२)

शासन अधिसुचना, वित्त विभाग, क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र./सेवा-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ दि.०१.०१.२०१६ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०१.०१.२०१६ रोजीचे पदाची विद्यमान वेतन संरचना वेतन बँड+ग्रेड वेतन नुसार सुधारीत वेतन संरचना (वेतन मॅट्रीक्स) मधील वेतन स्तर मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत वेतन निश्चिती करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनस्तर | पे मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस नाईक | एस-८ | रु.२५५००-८११००/- |
| पोलीस हवालदार | एस-९ | रु.२६४००-८३६००/- |

| वेतनवाढीचा दिनांक | विद्यमान पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती | वेतनवाढीचा दिनांक | सुधारीत पे मॅक्ट्रीक्स लेव्हल नुसार वेतननिश्चती |
|---|---|---|---|
| ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन ११९८० x२.५७ = ३०७७८.६/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.३१४००/- एस-८ | ०१/०१/२०१६ | विद्यमान मुळ वेतन १२२५० x२.५७ = ३१४८२.५/-<br>नजीकच्या रुपयात पुर्णांकीत करुन<br>रु.३२३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१६ | रु.३२३००/- एस-८ | ०१/०७/२०१६ | रु.३३३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१७ | रु.३३३००/- एस-८ | ०१/०७/२०१७ | रु.३४३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१८ | रु.३४३००/- एस-८ | ०१/०७/२०१८ | रु.३५३००/- एस-८ |
| ०१/०७/२०१९ | रु.३५३००/- एस-८ | ०१/०७/२०१९ | रु.३६४००/- एस-८ |
| ०१/०७/२०२० | रु.३६४००/- एस-८ | ०१/०७/२०२० | रु.३७५००/- एस-८ |
| ०१/०७/२०२१ | रु.३७५००/- एस-८ | ०१/०७/२०२१ | रु.३८६००/- एस-८ |
| १९/०७/२०२१ | रु.३८६००/- एस-८<br>पोना पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br><br>नियम ११ (१)(ए) नुसार पदोन्नतीच्या | १९/०७/२०२१ | रु.३९८००/- एस-८<br>पोना पदावर पदोन्नती झाल्याने विद्यमान पदावर मानीव वेतनवाढ<br><br>नियम ११ (१)(ए) नुसार पदोन्नतीच्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | (पोहवा) पदाची वेतननिश्चिती. **रु.३८७००/- एस-९** | | (पोहवा) पदाची वेतननिश्चिती. **रु.३९९००/- एस-९** |
| ०१/०७/२०२२ | रु.३९९००/- एस-९ | ०१/०७/२०२२ | रु.४११००/- एस-९ |
| ०१/०७/२०२३ | रु.४११००/- एस-९ | ०१/०७/२०२३ | रु.४२३००/- एस-९ |

प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या सुधारीत वेतननिश्चितीमुळे नमुद पोलीस अंमलदाराची दिनांक ०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१८ या कालावधीतील वेतनाच्या अनुज्ञेय थकबाकीची रक्कम आर्थिक वर्ष सन २०१९-२० पासून पुढील पाच वर्षात समान हफ्त्यामध्ये भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यात यावी व जानेवारी-२०१९ पासूनच्या वेतनाच्या थकबाकीची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी. सदरची वेतननिश्चिती ही वेतन पडताळणी पथकाच्या अधिन राहुन करण्यात येत असुन भविष्यात रक्कम अतिप्रदान झाल्याचे निर्दशनास आल्यास अतिप्रदान रकमेची वसूली नमूद अंमलदाराकडुन करण्यात येईल.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस